

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
Journal No. 40776

An International
Multidisciplinary
Quarterly Research Journal
ISSN 2277 - 5730

# AJANTA

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VII Issue - IV October - December - 2018

Marathi Part - III / Hindi - II

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING**
**2018 - 5.5**
**www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संत विचार आणि आचार यांचा सुरेख संगम म्हणजे आषाढी वारी<br>**प्रा. सुनिता गोरख रोकडे** | १-४ |
| २ | विभिन्न राज्यामध्ये राबविण्यात येणाऱ्या गृहनिर्माण योजनांचा आढावा<br>**प्रा. नरेश शंकरराव इंगळे** | ५-८ |
| ३ | जागतिकीकरणाची भारतीय शेतीपुढील आव्हाने व शेतकरी आत्महत्या<br>**Dr. (Mrs.) Anita V. Mahawadiwar** | ९-१४ |
| ४ | जागतिक मानव विकास निर्देशांक व भारत<br>**डॉ. विजया एच. राऊत** | १५-२२ |
| ५ | महिला सबलीकरण - एक आकलन<br>**प्रा. डॉ. सौ. उज्ज्वला आर. पाटील** | २३-२६ |
| ६ | शेतकऱ्यांच्या आत्मकथा - एक चिंतन<br>**डॉ. विजय शंकरराव दिघोरे** | २७-३० |
| ७ | भारतीय संविधान : भारताच्या आर्थिक विकासाचे इंजिन<br>**डॉ. सुरेश क. मगरे** | ३१-३६ |
| ८ | भारतासमोरील आव्हाने - जातिव्यवस्था<br>**प्रा. विनोद महादेवराव पुनवटकर** | ३७-३९ |
| ९ | जागतिकीकरणामुळे शिक्षणातील होणारे परिवर्तन<br>**प्रा. संजय दौलतराव बेले** | ४०-४५ |
| १० | चंद्रपूर जिल्ह्यातील सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगाचा अभ्यास<br>**गिरीश टी. पंचभाई**<br>**डॉ. योगेश वाय. दुधपचारे** | ४६-५१ |
| ११ | छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेत इतर जातीचे योगदान: एक अध्ययन<br>**प्रा. प्रविण श्रीकृष्ण राऊत** | ५२-५८ |
| १२ | पर्यावरण एक अभ्यास<br>**डॉ. एन. पी. कुडकेकर** | ५९-६३ |

# ६. शेतकऱ्यांच्या आत्मकथा - एक चिंतन

**डॉ. विजय शंकरराव दिघोरे**
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर, जि. नागपूर.

## प्रस्तावना

भारत हा कृषीप्रधान देश आहे हे आपण अनेक वर्षापासून ऐकतो. भारतीय अर्थव्यवस्था आजही कृषी प्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. आजही भारतातील एकुण लोकसंख्येपैकी जवळपास 60 टक्के लोकसंख्या उदरनिर्वाहासाठी कृषी आणि कृषी संबंधीत व्यवसायावर अवलंबून आहेत. आज कृषीवर आधारीत लोकांकडील उत्पन्नात वाढ न होता इतर क्षेत्रातील लोकसंख्या उत्पन्नात वाढ झालेली आहे. त्यामुळे आर्थिक विषमता निर्माण झालेली आहे.

भारतात शेतकऱ्यांच्या झालेल्या व होत असलेल्या आत्महत्या ही प्रत्येकच संवेदनशील समाजासाठी अतिशय लांच्छनास्पद बाब आहे. कुठल्याही संवेदनशील मानसाचे अंतःकरण विदीर्ण होईल अश्याच या घटना आहेत. शेतकऱ्याच्या आत्महत्या ग्रामीण जीवनाचे उद्ध्वस्त चित्र आपल्यासमोर प्रकर्षाने उभे आहेत. एकीकडे जागतीकीकरणाचे धोरण गतीमान बनवून विदेशी गुंतवणूकदारासाठी अर्थव्यवस्था खुली केली जात आहे. तर दुसऱ्या बाजूने शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येत आहे. भारतासमोर दहशतवाद, सांप्रदायिकत्ता, जातीयत्ता, भ्रष्टाचार, बेकारी, शेतीची दुरावस्था आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या या प्रश्नांनी मोठे आव्हान उभे केले आहे. सद्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही ज्वलंत समस्या आहे. भारताने स्विकारलेल्या खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या धोरणाचा गंभीर परिणाम आज सर्व क्षेत्रात दिसून येत आहे. विशेषतः शेती क्षेत्रावर या धोरणाचा मोठया प्रमाणावर परिणाम झाला आहे. अनुदानामधील कपातीमुळे खते, औषधे व बियाण्यांच्या किमतीमध्ये भरमसाठ वाढ झालेली आहे. परंतु त्या प्रमाणात शेतकऱ्यांना शेती व्यवसाय परवडेनासा झाला आहे. सुप्रसिध्द कृषी अर्थशास्त्रज्ञ स्वामीनाथन यांनी, भारतीय कृषी व्यवस्थेत काहीतरी भयंकर चुक होत आहे. व जर कृषी क्षेत्रात चुक होत असेल तर इतर कोणत्याही क्षेत्राचे भले होऊ शकनार नाही असे स्वार्थ उद्गार काढले आहेत.

ब्रिटिशाच्या 150 वर्षाच्या राजवटीत जेवढया आत्महत्या झाल्या नाहीत तेवढया गेल्या 20 वर्षात झाल्या आहेत. सन 1830–1909 या दरम्यान भारतात 22 भीषन दुष्काळ पडले होते. त्या वेळी शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या नाहीत भारतात. 1990 नंतर शेतकरी आत्महत्येची वाढती संख्या आणि प्रमाण यामुळे नोंदी ठेवण्यास सुरूवात झाली. भारतामध्ये 1995 पासून नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो हे शेतकऱ्यांच्या आत्महत्येची नोंद ठेवत आहे. यांच्या आकडेवारीवरून 2015–16 मध्ये महाराष्ट्र, तामिलनाडू, तेलंगणा आणि आंध्रप्रदेश या राज्यात सर्वाधीक आत्महत्या झाल्या आहेत. ही राज्ये दरडोई उत्पन्नाच्या बाबतीतही देशातील सर्वाधिक उत्पन्न असणारी राज्ये आहे. महाराष्ट्र राज्याचे उत्पन्न 147399 रू होते या राज्यात 3030 एवढया आत्महत्या झाल्या त्यात सर्वात जास्त हे विदर्भातील होते. विदर्भातील शेतकरी प्रामुख्याने कोरडवाहू शेती करणारे शेतकरी आहेत. जलसिंचनाच्या अपुऱ्या सोयी उपलब्ध

नसल्यामुळे त्यांना बारमाही पिके घेण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध नाही. त्यामुळे वरच्या पावसावर आणि निसर्गावरच शेतकऱ्यांचे संपूर्ण भवितव्य अवलंबुन आहे. पाऊस जास्त झाला तर पिकाचे नुकसान होते आणि पाऊस कमी झाला तर पिके येत नाहीत. पिक भरपुर आले तर त्याला योग्य भाव प्राप्त होत नाही अश्या दृष्टचकात शेतकरी भरडल्या जात आहे. कृषीप्रधान देशातील हजारोच्या संख्येने होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे सखोल चिंतन आणि त्यामागे असलेल्या मूलभूत कारणांचा शोध घेणे गरजेचे आहे.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे**

1) वाढता उत्पादन खर्च

शेतमाल उत्पादनाच्या खर्चामध्ये प्रचंड वाढ झाल्यामुळे रासायनिक खते, किटक नाशकांच्या किमतीमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. किटकनाशके, तननाशके, बी–बीयाने, रासायनिक खते, अवजारे व मजुंरीचे दर यामध्ये वाढ झाल्यामुळे उत्पादन खर्चात वाढ होत आहे. याकरीता कर्जाचा आधार शेतकऱ्याना घ्यावा लागत आहे. उत्पादन खर्च व उत्पन्न कमी यामुळे शेती तोटयाची बनत चालली असल्यामुळे शेतकरी नैराश्यातून आत्महत्या करीत आहेत.

2) नैसर्गिक असमतोल

भारतातील शेती निसर्गावर अवलंबुन असल्यामुळे व मागील काही दशकात हवामानात झालेल्या बदलामुळे नैसर्गिक असमतोल वाढला आहे. कधी अतीवृष्टी तर कधी अनावृष्टी अशी समस्या निर्माण झाली आहे. या समस्येचा सामना करतांना शेतकरी वर्ग हा संकटात सापडला आहे. शेतीमध्ये नापीकीमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येत वाढ झालेली दिसुन येते.

3) जलसिंचनाचा अभाव

भारतातील 61 टक्के शेती ही कोरडवाहू आहे तर 39 टक्के शेतीस पाणी पुरवठ्याची सोयी आहे. महाराष्ट्रामध्ये 84 टक्के शेती कोरडवाहू आहे तर 16 टक्के शेतीस पाणी पुरवठ्याची सुविधा आहे. कोरडवाहू शेतीमध्ये एक वेळाच पिक घेता येत असल्यामुळे व ती निसर्गावर अवलंबून असल्यामुळे उत्पादन कमी, उत्पादन खर्च जास्त होतो. परिणामी शेतकरी आपला उदरनिर्वाह करू शकत नसल्यामुळे आत्महत्येला बळी पडत आहे.

4) शेतीमालाच्या किमतीतील अस्थिरता

शेती मालाच्या किमतीमध्ये मोठ्या प्रमाणात चढ–उतार होत असतात. साठवणूक क्षमतेच्या अभावामुळे शेतकरी आपला माल बाजारात आणतात. त्याचबरोबर कर्ज फेडीकरीता आपला माल बाजारात आणतात. ज्यामुळे शेती मालाच्या किंमतीमध्ये घट होते, शेतकऱ्याच्या मालाचा भाव मध्यस्त ठरवतात. त्यामुळे शेतकऱ्यास उत्पादन खर्चाएवढा भाव मिळत नसल्यामुळे नैराश्यातून आत्महत्येचा मार्ग स्विकारतो.

5) खाजगी सावकारी कर्ज

सर्वच शेतकऱ्यांना वित्तीय संस्थाकडून कर्ज मिळू शकत नसल्यामुळे शेतकऱ्यांना खाजगी सावकारांकडून कर्ज घ्यावे लागते हे सावकार, व्यापारी, बागायतदार, मित्र, नातेवाईक यांच्यापैकी कोणीही असतात, हे चढत्या दराने कर्ज देतात. अल्प व मध्यम शेतकऱ्यांना अपेक्षेएवढे उत्पन्न होत नाही. पूर्वीचे कर्ज फेडण्याकरीताच आलेला उत्पन्न खर्च होते व तो पुन्हा दारिद्र्याच्या दृष्टचकात अडकतो व तो कर्जबाजारी होऊन आत्महत्येकडे वळतो.

6) अनुत्पादक कार्यासाठी कर्जाचा उपयोग

शेतीसाठी घेतलेल्या कर्जाचा उपयोग मुलामुलींचे शिक्षण, जुन्या कर्जाची परतफेड, लग्न समारंभ, कुटुंबातील सदस्याचे आजार, मुलीचे लग्न करण्याकरीता द्यावा लागणारा भरमसाठ हुंडा, आर्थिक स्थिती नसतांनाही लग्न समारंभावर बडेजाव म्हणून केला जाणारा भरमसाठ खर्च यासाठी करतात. उत्पादक कार्याकरीता न केलेल्या कर्जाच्या वापरामुळे उत्पादनात घट होते परिणामी कर्जात वाढ होऊन उत्पन्न कमी व खर्च जास्त अश्या अवस्थेतून नैराश्य निर्माण होऊन आत्महत्येस प्रवृत्त होतो.

7) शेतीपुरक व्यवसायाचा अभाव

भारतामधील शेती कोरडवाहू असल्यामुळे राजगार करणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे पुर्ण वेळ रोजगार उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे त्यांना वर्षभर रोजगार मिळण्याकरिता दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन व इतर शेतीवर आधारीत उद्योग निर्माण करून उत्पन्नाचा दुय्यम स्त्रोत उपलब्ध होणे गरजेचे आहे. परंतू भारतामध्ये प्रतिकुल हवामान, दुष्काळ, रोगराई यामुळे शेतीवर उदरनिर्वाह करणे कठीण होत आहे. शेतीमध्ये नापीकीची अवस्था निर्माण झाल्यामुळे शेतकरी उदासीन होऊन आत्महत्या करीत आहेत.

8) शेतकऱ्याच्या अनुदानात कपात

शेतकऱ्याच्या मालास किफायतशिरपणे भाव आणि ग्राहकांना परवडणाऱ्या किंमती हे गणित जगभरात कोठेच जमले नाही. त्याकरीता शासनास अनूदान देऊन हस्तक्षेप करावा लागतो. परंतू सरकारने शेतकऱ्यांच्या मिळणाऱ्या अनुदानात कपात केल्यामुळे शेतकऱ्यांना शेती करणे अवघड झाले व शेतकऱ्यांच्या निराशेच्या गर्तेत ओढल्या जाऊन आत्महत्येचा विचार करीत असतो.

शासनाने शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी विविध पॅकेज घोषीत केले आहेत. हे पॅकेज घोषीत केल्यानंतरही शेतकऱ्याची स्थिती सुधारलेली नाही किंवा त्यांच्या आत्महत्या थांबलेल्या नाहीत. याचे कारण असे की शासनाने ज्या योजना घोषीत केल्या त्याचा प्रत्यक्ष लाभ कर्जबाजारी, समस्याग्रस्त शेतकऱ्यांना प्राप्त होत नाही. त्यामुळे ती वरवरची मलमपट्टी ठरते. शेतकऱ्याच्या आत्महत्या रोखण्यासाठी आणि एकुणच ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी पक्षीय दृष्टीकोन व राजकारण बाजुला सारून त्यासाठी निरंतर व दीर्घकालीन उपायोजना आखणे गरजेचे आहे.

शेतकरी आत्महत्यावरील उपायोजना

1. शेतमालाच्या उत्पादनास उत्पादन खर्चावर आधारीत योग्य भाव ठरवून देण्यात यावेत.
2. शेतकऱ्यांना मानसिक आधार देऊन त्यांच्यात आत्मविश्वास व धैर्य निर्माण करावे याकरीता शासनस्तरावर व स्वयंसेवी संस्थांनी प्रयत्न करावे.
3. छोट्या व मध्यम शेतकऱ्यांना शेतीविषयी सोयीसह झीरो टक्के व्याजाने कर्ज वेळेवर मिळावे.
4. शेतकरी हिताच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी व शासकीय कामातील दफ्तर दिरंगाई दुर होणे आवश्यक आहे.
5. ग्रामीण भागातील खाजगी सावकारी व त्यांच्या व्याजदरावर नियंत्रण आणण्यात यावे.

6. परवानाधारक सावकाराकडून शेतकऱ्यांनी कर्ज शासनातर्फे सावकाराला देऊन शेतकऱ्यांना कर्जमुक्त करणे व परवानाधारक सावकारांची संख्या वाढविणे.

7. शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या कर्जाचा वापर उत्पादक कार्यासाठी व्हावा तो बिगरशेती कामासाठी व व्यसनाकरीता होऊ नये.

8. सिंचन विषयक सुविधेत वाढ करण्यात यावी.

9. कृषी आधारीत रोजगार निर्मितीवर अधिक भर देण्यात यावा.

10. ग्रामीण भागात बँकींग सुविधा वाढविण्यात याव्यात.

11. शेतकऱ्यांना शेतीमध्ये आधुनिक उत्पादन तंत्राने उत्पादन करण्यास प्रेरीत करण्यात यावे व त्याकरीता शासनाने आर्थिक अर्थसहाय्य करावे.

12. कृषी विमा योजनेमध्ये अधिक शेतकऱ्यांचा सहभाग वाढावा याकरीता प्रयत्न करण्यात यावेत.

13. शेतकऱ्यांना दरमहा निश्चित मानधन/पेन्शन देण्यात यावे.

14. प्रो. एम. एस. स्वामीनाथन यांची खर्च अधिक 50 टक्के नफा ही शिफारस अमलात आणण्यात यावी.

**संदर्भग्रंथ**

1. 1) ज्योतीबा गो. फुले : शेतकऱ्याचे आसुड नेहा प्रकाशन, नागपूर 17

2. 2) प्रा. डॉ. उमाकांत सावंत : शेतकऱ्यांच्या आत्महत्या शासन, राजकारण आणि शेतकरी आंदोलन, यशदा यशमंथन, ऑक्टोंबर – डिसेंबर 2009

3. 3) बी. एच. दलजी : महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे व उपाय ऑक्टोंबर–डिसेंबर 2009, खंड 33, अंक 3

4. 4) अजय दांडेकर : शेतकऱ्यांच्या आत्महत्या व ग्रामीण कंगालीकरण 2005

5. 5) डॉ. विश्वजीत मंडल : कर्ज आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या – एक दृष्टचक्र

6. यशदा यशमंथन, एप्रिल – जुन 2009

7. 6) र. पु. करूलकर : शेतकरी कर्ज मुक्ती प्रश्न – वस्तुस्थिती आणि पर्याय

8. अर्थसंवाद जानेवारी – मार्च 2008, खंड 31, अंक 4

9. 7) प्रकाश बाळ : मुक्ती आणि माफीचे राजकारण, दैनिक लोकमत, 6 एप्रिल 2017